<u>नगरसचिव कार्यालय</u>

**पुणे महानगरपालिका**
**महानगरपालिका सभा ठराव**

सभा क्रमांक :- ४४ दिनांक :- २८/१०/२००९

विषय क्रमांक:- ११० ठराव क्रमांक:- १७४ खाते - महा.आयुक्त

संदर्भ :- मा. अनिल भोसले, सभागृह नेते, मा. उल्हास उर्फ आबा बागुल व मा. विरेंद्र किराड यांची सुचना दिनांक २/६/२००९.

-----

पुणे महानगरपालिकेतर्फे कात्रज येथे सुमारे दीडशे एकर जागेत राजीव गांधी प्राणी संग्रालयात अत्यंत सुंदर व देखणे असे विविध प्रकारचे प्राणी या संग्रालयात आहेत.

पुणे शहरात देशाचे दिवंगत पंतप्रधान संगणक क्रांतीचे जनक स्व. राजीवजी गांधी यांचे नांव सदर उद्यानास आहे. स्व. राजीव गांधी यांचे पुणे शहरात कुठेही स्मारक अथवा पुतळा नाही. म्हणूनच माजी नगरसेवक गोपाळ तिवारी व त्यांच्या मित्र परिवारातर्फे स्व. राजीव गांधी यांचा पुतळा दिल्ली येथील विख्यात शिल्पकार पद्मश्री राम सुतार यांचेकडून तीन फुटी ब्राँझचा पुतळा बनवून घेतला असून त्यास लागणारी कला संचनालय महाराष्ट्र शासन यांची मान्यता देखील मिळालेली आहे.

स्व. राजीव गांधी यांचा अर्ध पुतळा स्वीकार करून कात्रज येथील पुणे मनपाचे स्व. राजीव गांधी झु लॉजिकल पार्क व ॲनिमल रिसर्च सेंटर येथील जागेत प्रवेशव्दाराच्या समोरील दर्शनी भागात त्याची स्थापना करावी.

या कार्यक्रमास मा. श्रीमती सोनियाजी गांधी, अध्यक्षा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांना किंवा त्यांच्या कुटूंबातील अन्य कोणालाही आमंत्रित करण्यात यावेत. तसेच संगणक क्षेत्रातील स्व. राजीव गांधी यांचे एकेकाळचे सहकारी सॅम पित्रोडा यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. ना. शरदरावजी पवार, कृषी मंत्री, भारत सरकार, मा. सुरेशजी कलमाडी, खासदार, पुणे, मा. अजितदादा पवार, जलसंपदा व पालकमंत्री, पुणे जिल्हा यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात यावा. तसेच माजी नगरसेवक श्री. गोपाळ तिवारी यांनाही आमंत्रित करण्यात यावेत.

तसेच छत्रपती शाहु महाराज व राजीव गांधी हे दोन ही पुतळे बसविण्यात यावेत.

सदर कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.